# शुध्दीपत्रक

## जिल्हा व सत्र न्यायालय, चंद्रपूर भरती प्रक्रिया–२०२३
## "लघुलेखक (ग्रेड–३)" पदाचे उमेदवारांना सुचना

संदर्भ :– यापूर्वी प्रसिध्द केलेली सुचना दिनांक ०३/०९/२०२४

यापुर्वी प्रसिध्द करण्यात आलेल्या सुचनेनुसार "लघुलेखक (ग्रेड–३)" या पदाकरीता मराठी भाषेतील टंकलेखन परीक्षा दिनांक ०९/०९/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून जिल्हा न्यायालय, चंद्रपूर येथे घेण्यात येणार असल्याबाबत कळविण्यात आलेले होते. परंतु माननिय उच्च न्यायालय यांचे निर्देशानुसार सदरहु परिक्षा दिनांक ०९/०९/२०२४ रोजी **सकाळी ९.००** वाजेपासून जिल्हा न्यायालय, चंद्रपूर येथे घेण्यात येणार आहेत याची संबंधीत पात्र उमेदवारांनी नोंद घ्यावी व सदर परीक्षेकरीता उमेदवारांनी खालील तक्त्यात नमुद केलेल्या वेळेच्या एक तास पूर्वी न चुकता जिल्हा न्यायालय, चंद्रपूर येथे उपस्थित राहावे.

परिक्षा सुरू झाल्यानंतर उशीराने आलेल्या उमेदवारांना परिक्षेकरीता प्रवेश दिला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सदर परीक्षेकरीता येतांना आपणास निर्गमित केलेले प्रवेश पत्र (**Hall Ticket**) सोबत आणणे अनिवार्य आहे.

### मराठी टंकलेखन (Marathi Typing) परीक्षेचे वेळापत्रक
### दिनांक ०९/०९/२०२४

| मराठी टंकलेखन परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या यादीतील अनुक्रमांक | एकूण उमेदवारांची संख्या | मराठी टंकलेखन परीक्षेची वेळ |
|---|---|---|
| ०१ ते ३७ | ३७ | सकाळी ९.०० वाजता |
| ३८ ते ७४ | ३७ | सकाळी ९.३० वाजता |

भरती प्रक्रियेच्या कार्यक्रमानुसार मराठी टंकलेखन परीक्षेचा निकाल दिनांक ०९/०९/२०२४ रोजी तसेच इंग्रजी टंकलेखन परिक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची इंग्रजी टंकलेखन परिक्षा दिनांक १०/०९/२०२४ रोजी सकाळी ९.०० वाजता पासून घेण्यात येईल व निकाल त्याच दिवशी जिल्हा न्यायालय, चंद्रपूर येथील सुचना फलकावर व अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल. त्याकरीता उमेदवारांनी नमुद दिनांकास **सकाळी ८.००** वाजता न चुकता जिल्हा न्यायालय, चंद्रपूर येथे उपस्थित राहावे.

मुलाखतीकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची मुलाखत दिनांक १८/०९/२०२४ पासुन घेण्यात येईल. सविस्तर वेळापत्रक जिल्हा न्यायालयाचे सुचना फलकावर तसेच संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

टिप :–१) संगणकाचे मराठी/इंग्रजी भाषा टंकलेखन परीक्षेकरीता उमेदवार स्वत:चा की बोर्ड (**Keyboard**) (**USB**) वापरू शकतील. परंतु **Keyboard** मध्ये काही तांत्रीक अडचण किंवा बिघाड झाल्यास त्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. निवड समिती जबाबदार राहणार नाही.

२) परीक्षेच्या वेळापत्रकामध्ये बदल करण्याचे अधिकार निवड समितीकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

३) जिल्हा न्यायालयाचे संकेत स्थळ खालीलप्रमाणे आहे.
**http://chandrapur.dcourts.gov.in**

3/9/24

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
चंद्रपूर.